पिपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११०१८. लेखा विभाग ६५७

क्रमांकः- लेखा/पेन्शन/२३/कावि/ /२०२०

दिनांकः- १७/१/२०२०

<u>विषय</u>:- **सेवानिवृत्ती वेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन प्रकरणे परिपूर्ण करुन वेळेत सादर करणे बाबत..**

**संदर्भः-** मा.दिलीप के.हाथीबेड, सदस्य भारत सरकार, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग यांचे दिनांक २७/१२/२०१९ रोजीचे पत्र व त्यालगत श्री उल्हास दगडू थिगळे, एम.पी.डब्ल्यु. भोसरी मनपा रुग्णालय यांचा दि.१६/११/२०१९ चा तक्रारी अर्ज.

<u>परिपत्रक</u>

म.न.पा.चे सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे कर्मचारी, मयत झालेले कर्मचारी व त्यांचे वारसाला सेवानिवृत्ती नंतर अंतिम अर्थिक लाभ वेळेत मिळत नाही. आरोग्य विभागात बहुसंख्य कर्मचारी अशिक्षित व अज्ञानी असतात त्यांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. काही वेळेला कारण नसताना जाणीव पूर्वक अडचणी निर्माण केल्या जातात. सेवानोंद पुस्तकातील नोंदी अपूरी/अर्धवट असल्याचे दर्शविले जाते. त्यासाठी संबंधीत कर्मचारी अथवा त्याचे वारसदारांना अपूर्ण सेवानोंदी पूर्ण करणेची अप्रत्यक्षपणे सक्ती केली जाते. तसेच सेवानोंद पुस्तकात रजेचे हिशोब वेळच्यावेळी अदयावत न केल्यामुळे त्याची वसूली कर्मचा-याचे अंतिम अर्थिक प्राप्त लाभातून कपात करणेत येते. अशा स्वरुपाची तक्रार उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये प्राप्त झाली आहे.

तरी, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना कळविणेत येते की, आपल्या नियंत्रित विभागातील कर्मचा-यांच्या सेवानोंद पुस्तकातील नियमित वेतनश्रेणीतील नेमणूक आदेश, पदोन्नत्ती आदेश नोंद, वार्षिक वेतनवाढी, सुधारीत सेवाअंतर्गत प्रगती योजनेनुसार १२/२४ वर्षाची वेतननिश्चिती, रजा मंजूरी आदेश, रजेचा हिशोब, सेवापडताळणी, वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती आदेश इ.आदेशाच्या नोंदी व सेवेच्या अनुषंगाने असणा-या

इतर नोंदी वेळच्यावेळी करणेत याव्यात. जेणेकरुन सेवानिवृत्ती वेळी सेवानोंद पुस्तकात त्रृटी राहणार नाही.

महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतन नियम १९८२ मधील नियम १२१ (१)(सी), १२३(१) नुसार नियत वयोमानाची प्रकरणे किमान ८ महिने आगोदर सुरु करुन मु.ले.प. विभागाचे दाखल्यासह सेवानिवृती वेतन प्रकरणे अदयावत सेवानोंद पुस्तकासह किमान १ महिना आगोदर लेखा विभागात सादर करावीत. तसेच आपले विभागाकडे प्रलंबित असलेली निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणांमध्ये विशेष लक्ष घालून परिपुर्ण करुन प्रकरणे मु.ले.प.विभागा मार्फत त्वरीत लेखा विभागाकडे सादर करावीत. जेणेकरुन कर्मचा-याला/कर्मचारी मृत्युनंतर त्याचे वारसाला लेखा विभागातून आर्थिक लाभ वेळेत देणे सुलभ होईल. तसेच यापुढे सेवा निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणे लेखा विभागाकडे वेळेत प्राप्त न झालेस व आर्थीक लाभाबाबत कर्मचा-यांनी/वारसांनी तक्रार केल्यास महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतननियम १९८२ मधील कलम १२९(अ), १२९(ब), नुसार त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील यांची सर्व विभागप्रमुखानी/शाखाप्रमुखानी स्पष्ट नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

प्रत:- सर्व शाखाप्रमुख / विभागप्रमुख

प्रत:-१ दिलीप के. हाथीबेड, सदस्य
भारत सरकार, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग
सामाजिक न्याय एवं अधिकारीता मंत्रालय
बी विंग, चतुर्थ तळ, लोक नायक भवन,
खान मार्केट नई दिल्ली ११०००३
२ श्री उल्हास दगडू थिगळे